<u>कोर्ट विद्यमान न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, भिवापूर, ता. भिवापूर यांचे न्यायालयात.</u>

नियमीत फौ.ख.क्र.३६/२०१९
सर -वि- सुरेश + १
निशाणी क्र. <u>११</u>

**<u>दो षा रो प</u>**

मी, वि. सं. डामरे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, भिवापूर या द्वारे तुम्हीः

१) **सुरेश गुलाबराव शिंदे**,
वय ५९ वर्षे, व्यवसायः शेती,

२) **सौ. उज्वला सुरेश शिंदे**,
वय ४२ वर्षे, व्यवसायः शेती,

दोन्ही रा. सुहास नगरी, नरसाळा, प्लॉट नं.९,
आशिर्वाद सिध्दीविनायक सोसा.नागपूर, जि. नागपूर.

यांच्यावर खाली दिल्याप्रमाणे आरोप ठेवतो :

तुम्ही दिनांक ०४.११.२०१८ रोजी १.०० वा. चे सुमारास मौजा भोवरी, ता. भिवापूर येथे समान उददेशाने फिर्यादी सौ. नैना राजेंद्र शिंदे यांना, जे की हत्यार म्हणून वापरल्यास मृत्यू संभवू शकते अशा उभारीने तिच्या डाव्या हातावर मारुन इच्छापुर्वक दुखापत केली आणि त्यायोगे भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ सह कलम ३४ याखाली शिक्षापात्र असलेला आणि या न्यायालयात दखलपात्र असा अपराध केला आहे.

दुसरे असे की उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी तुम्ही समान उददेशाने फिर्यादी व तिच्या पतीला शिवीगाळ केली व उददेशपुर्वक अपमान करुन सार्वजनिक शांततेचा भंग होण्याच्या उददेशाने प्रक्षोभीत केले आणि त्यायोगे भारतीय दंड संहितेचे कलम ५०४ सह कलम ३४ याखाली शिक्षापात्र असलेला आणि या न्यायालयात दखलपात्र असा अपराध केला आहे.

तिसरे असे की उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी तुम्ही समान उददेशाने फिर्यादीला मारण्याची धमकी देवून फौजदारीपात्र धाकदपटशा केली आणि त्यायोगे भारतीय दंड संहितेचे कलम ५०६ सह कलम ३४ याखाली शिक्षापात्र असलेला आणि या न्यायालयात दखलपात्र असा अपराध केला आहे.

आणि याद्वारे मी असा निर्देश देत आहे की, उक्त आरोपाबाबत तुमची न्यायचौकशी करण्यात यावी.

स्वा/-
( वि. सं. डामरे )
दिनांक:०८/०७/२०१९ न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
भि वा पू र

दोषारोपातील मजकुर आरोपींना वाचुन व समजावुन सांगण्यात आला असता त्याचा त्यांनी इन्कार केला व निर्दोष असल्याचे प्रतीकथन करुन सुनावणीस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

स्वा/-
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
भि वा पू र

DISTRICT COURT NAGPUR

DISTRICT COURT
NAGPUR